पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
क्रं.मातंवि/११/कावि/३८/२०२२

दिनांक- १ / ०४ / २०२२

विषय- बायोमेट्रीक थम्ब / फेस रिडींग रजिस्ट्रेशनबाबत...
संदर्भ- प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. प्रशा/तप/१३/कावि/६२/२०१६, दि.०५/०५/२०१६

परिपत्रक,

उपरोक्त संदर्भिय प्रशासन विभागाकडील परिपत्रकान्वये कर्मचा-याचे स्थानांतरण / बदली झालेनंतर स्थानांतरण झालेल्या विभागामध्ये अधिकारी/कर्मचारी यांची आस्थापना ज्या ठिकाणी आहे त्या विभागामध्ये संबंधितांचे थम्ब / फेस रजिस्ट्रेशन शाखाप्रमुखांच्या लेखी परवानगीने करण्यात यावे व पुर्वीच्या विभागातील तसेच इतरत्र थम्ब/ फेस रजिस्ट्रेशन असल्यास ते रद्द करावे. तसेच सर्व विभागप्रमुखांनी आपले आस्थापनेवरील कर्मचा-यांचे नेमुन दिलेल्या एकाच ठिकाणच्या मशीनवर थम्ब / फेस रजिस्ट्रेशन असलेबाबत संबंधित कर्मचा-यांकडुन लेखी दाखला घेणेबाबत कळविणेत आले होते.

तथापि, माझे असे निदर्शनास आले आहे की अद्यापही काही कर्मचारी त्यांना नेमुन दिलेल्या थम्ब / फेस रिडींग मशीन व्यतिरिक्त इतर सोईच्या ठिकाणी रजिस्ट्रेशन करणेसाठी संबंधित रजिस्ट्रेशन करण्या-या संस्थेवर दबाव आणतात. सदरची बाब कार्यालयिन शिस्तीचा भंग करणारी आहे. अशा प्रकारे वर्तन करणा-या अधिकारी/कर्मचारी यांचेवर प्रशासन विभागामार्फत शिस्तभंगाची/ दंडात्मक कारवाई करणेत येईल याची नोंद घेणेत यावी.

तरी या परिपत्रकान्वये सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना कळविणेत येते की बायोमेट्रीक थम्ब / फेस रिडींग रजिस्ट्रेशन आपली नेमणुक केलेल्या विभागामध्येच करणेत यावे. तसेच इतरत्र बदलीपुर्वीच्या विभागामध्ये अथवा अन्य ठिकाणी रजिस्ट्रेशन असल्यास सदरचे रजिस्ट्रेशन त्वरित रद्द करुन फक्त सध्या नेमणुक केलेल्या विभागामध्येच रजिस्ट्रेशन असलेबाबतचा दाखला आपले विभागप्रमुखांकडे सादर करणेत यावा.

सदरबाबत सर्व विभाप्रमुखांनी आपले आस्थापनेवरील कर्मचा-यांना योग्य त्या सुचना देऊन दिनांक 15/04/2022 पर्यंत सर्व संबंधित कर्मचा-यांकडुन एकाच ठिकाणी बायोमेट्रीक थम्ब / फेस रिडींग रजिस्ट्रेशन करत असलेबाबत दाखला घेऊन आपले विभागामध्ये फायलिंग करुन ठेवणेत यावा व दिनांक 16/04/2022 रोजी दाखला प्राप्त न

(कृपया मागे पहा....)

Scanned with CamScanner

झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांची संगणक क्रमांकासह यादी प्रशासन विभागाकडे कळविणेत यावी. जेणेकरुन सॉफ्टवेअरमध्ये योग्य ती तपासणी करुन नेमणुक केलेल्या विभागाव्यतिरिक्त इतर ठिकाणी ज्या कर्मचा-यांचे रजिस्ट्रेशन असेल व सदर ठिकाणी संबंधित अधिकारी/कर्मचारी त्यांची दैनंदिन हजेरी नोंद करत असल्याबाबत आढळुन आल्यास त्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर प्रशासन विभागामार्फत शिस्तभंगाची / दंडात्मक कारवाई प्रस्तावित करणेत येईल.

2/4/22

(विकास ढाकणे)
अतिरिक्त आयुक्त-१
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८

प्रति,
सर्व संबंधित विभाग

प्रत,
मे.इंदु इन्फोटेक सोल्युशन
भोसरी.

आपण आपले संस्थेमार्फत बायोमेट्रिक थम्ब/फेस रिडींग रजिस्ट्रेशन करणेकामी नेमणुक करणेत आलेल्या कर्मचा-यांना मनपा अधिकारी/कर्मचारी यांचे नव्याने रजिस्ट्रेशन करतांना संबंधित विभागप्रमुखांचे लेखी परवानगीशिवाय रजिस्ट्रेशन करणेत येऊ नये याची दखल घ्यावी. यापुढे अशा प्रकारची नोंद केल्याचे निदर्शनास आल्यास आपणावर दंडात्मक कारवाई करणेत येईल.

Scanned with CamScanner